# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०१.०७.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ३०.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १० केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून २७,८४,७११/—रू. चा मुद्‌देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करुन ४३,७६०/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,८७६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,००,७८१/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— गांजा बाळगून वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ३०.०६.२०२६ चे १४.४० वा. ते १९.१० वा. चे दरम्यान, अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलिंग करीत असता, त्याना माहिती मिळाली की, एका अशोक लेलॅन्ड सहाचाकी ट्रकमध्ये गांजाची वाहतुक केली जात आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे पारडी हद्दीत, भंडारा—नागपूर राष्ट्रीय महामार्गावर, वन उपज नाक्यासमोर, उमिया कॉम्प्लेक्सजवळ सापळा रचून, ट्रक क्र. एमएच ४० सीटी ६४८१ यावर संशय आल्याने त्यास थांबवून, ट्रक चालकास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव मोहम्मद अलाउद्यीन मोहम्मद जमालुद्यीन शराफत अली मलिक वय ४० वर्षे रा. मुळ गाव डिवाई, शेखान मोहल्ला, तहसील डिवाई, जि. बुलंदशहर (उत्तरप्रदेश), ह.मु. म्हॉडा क्वॉर्टर, बिल्डींग क्र. ५, दुसरा माळा, एस.आर. कॉलनी, कपीलनगर, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याचे ताब्यातील ट्रकची पाहणी केली असता, त्याचे ताब्यातील ट्रकचे केबिनमध्ये ५० किलो ५६० ग्राम अंमली पदार्थ गांजा मिळून आला. एनडीपीएस कायद्याचे तरतुदींचे तंतोतंत पालन करुन, आरोपीचे ताब्यातुन गांजा, एक ओपो कंपनीचा मोबाईल व ट्रक असा एकुण २७,७९,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची अधिक विचारपूस केली असता, त्याने संबलपुर, राज्य ओडीसा येथील त्याचा साथीदार पाहिजे आरोपीचे मार्फतीने विक्रीकरीता आणल्याचे सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्‌याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगून वाहतुक करतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पारडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्येमालासह पुढील कार्यवाहीकरीता पारडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपुर शहरचे, मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य.गुन्हेशाखा) श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सारंग मिराशी व त्यांचे पथकाने केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे कोराडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी नामे धंनजंय कृष्णमुर्ती नायक वय ३९ वर्ष रा. बाबा बुधाजी नगर, गुरुद्वाराजवळ, पाचपावली, नागपूर यांचे ट्रक बॉडी बनविण्याचे गॅरेज असून, तेथे राजबहादुर बन्सबहादुर गुरुम वय ३२ वर्ष रा. वार्ड क्र. १४, ढाचा भवन, कुरुद भिलाई (छत्तीसगढ) ह.मु. कवठा, नागपूर हा तेथे गॅरेजमध्ये काम करतो. दिनांक ३०.०६.२०२६ चे २०.४५ वा. चे सुमारास, फिर्यादीकडे काम करणार राजबहादुर हा त्याचे यामाहा एफझेड मोटरसायकल क्र. एमएच ३१ ईबी ३००६ ने पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील कवठा रोडवरील काशी गार्डन समोरुन जात असता, एका अनोळखी चारचाकी वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, त्याचे मोटरसायकलला धडक देवुन कवठा गावाचे दिशेने पळुन गेला. अपघातामध्ये राजबहादुर हा वाहनासह खाली पडल्याने त्याचे डोक्याला मार लागुन तो गंभीर जखमी झाला. जखमी यास उपचाराकरीता मेयो रूग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. निशा गवळी ९८३४३२७९२५ यांनी अनोळखी चारचाकी वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे अजनी</u> :—** दिनांक ३०.०६.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीत जुने मेडीकल हॉस्पिटल चे जुने गेटसमोरील खानावळ जवळ, एक अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे ५० वर्ष वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. मृतकाचे वर्णन—रंग—सावळा, चेहरा—गोल, उंची ५ फुट ५ इंच, केस—काळे, बांध—मध्यम, डोळे—काळे, अंगात— निळया रंगाचा फुलशर्ट व राखाडी रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. नमुद वर्णनाचे इसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अजनी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोअं. अमित उके यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे अजनी येथे सपोनि. सचिन निंबाळकर ९४२३५६४२८९ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे तहसील</u> :—** कु. जोया फातिमा जहीर अंसारी वय १५ वर्षे रा. तकीया दिवाणशाह, तहसील, नागपूर ही पारिवारीक त्रासाला कंटाळून दिनांक १३.०४.२०२६ चे १५.३० वा. पासून पोलीस ठाणे तहसील हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेली. आजपावेतो घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ४ फुट ९ इंच, केस—काळे लांब, डोळे—काळे, नाक—सरळ, अंगात—सलवार सुट व काळया रंगाचा बुरखा नकाब सहीत घातलेला आहे. भाषा—उर्दु व हिंदी बोलते.

**<u>२) पोलीस ठाणे सक्करदरा</u> :—** सौ. मेघा अजय मंडपे वय ३५ वर्षे रा. जुना बिडीपेठ, सक्करदरा, नागपूर हया दिनांक २६.०६.२०२६ चे १३.३० वा. पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील नेट कॅफेवर कामगारांची यादीत नाव पाहणेकरीता घरुन निघून गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट ५ इंच, डोक्याचे केस—काळे व लांब, अंगात—हिरव्या रंगाची शॉर्ट कुर्ती व निळया रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलतात. ओळखचिन्ह—डावे हातावर इंग्रजीत ‘एम डी’ अक्षरे गोंदलेले आहेत.

**<u>३) पोलीस ठाणे अंबाझरी</u> :—** कु. संस्कृति उर्फ जुही जिवन तेलगोटे वय २२ वर्षे रा. पांढराबोरी, संत रविदास मंदीरजवळ, अंबाझरी, नागपूर ही दिनांक २७.०६.२०२६ चे १७.३० वा. सुमारास, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची ५ फुट ५ इंच, डोक्याचे केस—काळे व लांब, डोळे—काळे, अंगात—गुलाबी जांभळया रंगाची टि—शर्ट व राखाडी रंगाचा लोअर पॅन्ट तसेच, पायात पांढरे रंगाचे क्रॉक्स घातलेले आहेत. भाषा—मराठी/हिंदी बोलते.

**<u>४) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** कु. अनुष्का राजेश ठोंबरे वय १९ वर्षे रा. चिटणवीस नगर, प्लॉट क्र. ८१, नंदनवन, नागपूर ही दिनांक २४.०६.२०२६ चे १५.१५ वा. पासून पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट ६ इंच, केस—काळे लांब, अंगात— बैंगनी व क्रिम रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते. ओळखचिन्ह—डावे डोळयाखाली जुने माराचे निशान आहे.



जोया



सौ. मेघा



संस्कृति



अनुष्का

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**